ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २३ | पुणें, बुधवार तारीख १७ एप्रिल, १९५७ | अंक १६

## विविध माहिती

**कौशल्याच्या कामाचें शिक्षण**—दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत ५,००० उमेदवारांना कौशल्याचीं कामें करण्याचें शिक्षण देण्याचें भारताच्या सरकारनें ठरविलें आहे. त्यासाठी एक स्वतंत्र योजनाच आंखण्यांत आली आहे. मुंबई, कलकत्ता, ग्वाल्हेर, अशांसारख्या औद्योगिक केंद्रांतून उमेद्‌वारांच्या शिक्षणाची सोय करण्यांत येणार आहे.

**खडे तात्त्विक बोल**—आंध्र सरकारचे मुख्य मंत्री श्री. संजीव रेड्डी जागतिक आरोग्यदिनाच्या प्रसंगीं हैद्राबाद शहरांत बोलतांना म्हणाले कीं भारतामधील बहुसंख्य लोकांना पुरेसें अन्नच मिळत नाहीं. अशा परिस्थितींत समतोल व चौरस आहारासंबंधींचा सर्व प्रचार केवळ तात्त्विक स्वरूपाचा ठरल्यास त्यांत नवल नाहीं.

**हैड्रोजन बॉंबचा जपानला धोका**—सोव्हिएट रशियानें नुकताच आणखी एक हैड्रोजन बॉंबचा स्फोट केला. रशियांतील ह्या स्फोटामुळें जपानवर विशेष प्रतिकूल परिणाम होतो, असें जपानी शास्त्रज्ञांचें म्हणणें आहे. प्रत्येक स्फोटानंतर एक महिना-भर जपानच्या वायव्य भागांत किरणोत्सर्गी पाऊस पडतो असें ते म्हणतात.

**लोकसभेंत अधिक स्त्रिया**—भारताच्या दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुकींत विधानसभांतून व लोकसभेंत अधिक स्त्रिया निवडून आल्या आहेत. पहिल्या सार्वत्रिक निवडणुकांत लोकसभेंत २१ व राज्यांच्या विधानसभांतून ८० स्त्रिया निवडून आल्या होत्या. नुकत्याच झालेल्या निवडणुकांतील यशस्वी स्त्रियांची संख्या अनुक्रमें २७ व १९५ अशी आहे.

**रोमन नाणीं सापडलीं**—आंध्रमध्यें नागार्जुनकोंडा ह्या धरणाच्या ठिकाणीं उत्खननाचें काम चालूं असतां रोमन साम्राज्याचीं सोन्याचीं नाणीं सांपडलीं. तीं चांगल्या स्थितींत आहेत व त्यावरील लॅटिन अक्षरेंहि वाचतां येण्यासारखी आहेत. ह्या ठिकाणीं असलेल्या विजयपुरी ह्या प्राचीन शहराचा रोमन साम्राज्यांशीं निकटचा व्यापारी संबंध होता असें सिद्ध झालें आहे.

**चीनमध्यें प्रेतदहनाचा प्रचार**—मृत माणसांचीं शरीरें पुरण्यापेक्षा जाळणेंच युक्त आहे, अशा प्रकारचा प्रचार चीनच्या सरकारनें सुरू केला आहे. चीनमध्यें पितृपूजेला विशेष स्थान असल्यामुळें प्रेतें जाळण्याची कल्पना लोकांमध्यें सावकाशीनें प्रसृत करण्यांत आली पाहिजे असें सरकारचें मत आहे. कोणावर सक्ति करण्याच्या विरुद्ध सरकार आहे.

**लेनिनचें मार्गदर्शक पत्र**—सोव्हिएट रशिआचा संस्थापक लेनिन ह्यानें मरणापूर्वीं रशिअन कम्युनिस्ट पक्षाच्या चिटणिस-पदावरून स्टॅलिनची उचलबांगडी करावी असा आदेश दिल्याचा प्रवाद बरींच वर्षें प्रचलित होता. आतां तें सुप्रसिद्ध पत्र मॉस्को येथील लेनिनविषयक वस्तुसंग्रहालयांत लोकांना पहाण्यासाठीं ठेवण्यांत आलें आहे.

**अणुभट्टीचे अंतरंग**—अणुभट्टींतील ज्वलनक्रिया चालू झाल्यानंतर आंत काय होतें हें पहाण्याची सोय आतां उपलब्ध झाली आहे. एका टेलिव्हिजन कॅमेराच्या साह्यानें ही गोष्ट शक्य झाली आहे. पाण्यानें वेढलेल्या अणुभट्टीभोंवतालीं हा कॅमेरा बसविण्यांत येतो.

**आयुर्वेदाचा ज्ञानकोश**—त्रिवेंद्रम् येथील आयुर्वेद कॉलेजचे प्रिन्सिपल डॉ. लक्ष्मीपती ह्यांनीं आयुर्वेदविषयक ज्ञानाचा एक ज्ञानकोश इंग्रजी भाषेंत तयार केला आहे. ह्या ग्रंथाला मदत म्हणून भारताच्या सरकारनें १०,००० रुपयांची रक्कम मंजूर केली आहे.

**ब्रिटनचा निर्यात व्यापार**—कोरिआंतील युद्धापासून पश्चिम युरोपांतील राष्ट्रांनीं चीनशीं करण्यांत येणाऱ्या व्यापारावर कडक निर्बंधणें घातलीं. पण त्यामुळें ब्रिटनचा निर्यात व्यापार बराच घटला. हीं नियंत्रणें सैल करण्याचा विचार ब्रिटिश सरकार करीत आहे.

**ब्रिटिश विद्यार्थ्यांत धूम्रपानाचें व्यसन**—ब्रिटनमधील शाळकरी विद्यार्थ्यांत धूम्रपानाचें व्यसन चिंताजनक प्रमाणांत पसरलें असल्याचें आढळून आलें आहे. आठ वर्षांचे विद्यार्थीहि सिगारेट ओढतात, आणि १२–१४ वर्षें वयाचे विद्यार्थी धूम्रपाना-वर चांगलेंच आसक्त झाल्याचें दिसून आलें आहे.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## केरळमधील कम्युनिस्ट सरकारपुढील प्रश्न

भारतामधील दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुका संपल्या असून संघराज्यांतील बहुसंख्य राज्यांतून कॉंग्रेस पक्षाचीं मंत्रिमंडळें पुन्हां अधिकारपदावर आलीं आहेत. फक्त केरळ राज्यांत मात्र कम्युनिस्ट पक्षाला मंत्रिमंडळ बनविण्यापुरतें मताधिक्य लाभून तो पक्ष सत्ताधारी झाला आहे. कम्युनिस्ट विचारप्रणालींत शासन-संस्था आणि अर्थव्यवस्था ह्यांचे संबंध कांहीं विशिष्ट पद्धतीवर आधारलेले असतात. ह्या पद्धतीचें थोडक्यांत वर्णन करावयाचें तर विशिष्ट आर्थिक ध्येयें निश्चित करून तीं साधण्यासाठीं शासनसंस्थेचा उपयोग कम्युनिस्ट राज्यकर्ते करतात असें म्हणतां येईल.

तथापि, केरळमधील कम्युनिस्ट सरकारला ह्या बाबतींत इतर कम्युनिस्ट सरकारांना असणारें अनिर्बंध स्वातंत्र्य नाहीं. भारताच्या राज्यघटनेच्या चौकटींत राहूनच त्याला आपलीं आर्थिक उद्दिष्टें साधतील तितकीं साधावयाचीं आहेत. केरळच्या कम्युनिस्ट मंत्रिमंडळाला ह्याची जाणीव असून राज्यघटनेशीं एकनिष्ठ राहण्याच्या शपथाहि मंत्र्यांनीं घेतल्या आहेत. पण घटनेमुळें पडणारीं बंधनेंच फक्त नव्या सरकारला पाळावयाचीं आहेत असें नाहीं. केरळ राज्यांतील भौतिक परिस्थितीमुळें पडणाऱ्या मर्यादाहि त्याला पाळाव्या लागतील. ह्या राज्यांतील परिस्थिति स्थूलमानानें अशी आहे. राज्याचा विस्तार सुमारें १५,००० चौरस मैलांचा आहे व त्याची लोकसंख्या दाट असून बहुसंख्य लोक चरितार्थासाठी जमिनीवर अवलंबून आहेत. सर्वांना पुरेशी जमीन अर्थातच नाहीं. परिणामतः भूमिहीन मजुरांची संख्या मोठी आहे. ग्रामीण भागांत व शहरांत बेकारीचें प्रमाण खूप आहे. मोठे कारखाने फारसे नाहींत. परदेशीयांच्या मालकीचे चहाचे मळे आहेत. त्यांचें प्रथम राष्ट्रीयीकरण केल्यास देशांतील पैसा देशांतच राहील असें नव्या मंत्रिमंडळाचें म्हणणें आहे. पण ह्या बाबतींत मध्यवर्ती सरकारच्या अनुमतीशिवाय कांहीं करतां येण्यासारखें नाहीं. मिरीं आणि काजू ह्यांची निर्यात राज्यांतून मोठ्या प्रमाणावर होते. त्यामुळें होणाऱ्या उत्पन्नांत हल्लींपेक्षा अधिक वांटा मिळविण्याचा प्रयत्न राज्य सरकार करणार आहे. त्याशिवाय इतर कांहीं उपाय योजून जनतेची आर्थिक स्थिति सुधारण्याचा प्रयत्न करण्यांत येणार आहे. जमीनधारणाची कमाल मर्यादा ठरवून त्यापेक्षा अधिक जमीन भूमिहीनांना वाटण्याचा सरकारचा इरादा आहे. नवे कारखाने काढणें व जुने ताब्यांत घेणें हाहि उपाय योजण्यांत येणार आहे. घटनेच्या मर्यादा व नैसर्गिक साधनसामुग्रीच्या अभावाच्या मर्यादा लक्षांत घेतां केरळच्या सरकारपुढील प्रश्न गुंतागुंतीचे व दीर्घकालीन उपायांची जरूरी असणारे असे आहेत.

केरळमधील आर्थिक प्रश्नासंबंधीं बोलतांना भारताचे एका वेळचे अर्थमंत्री, श्री. जॉन मथाई ह्यांनीं तीन सूचना केल्या आहेत. त्यांच्या मतानें राज्याच्या सरकारनें सहकारी चळवळीचा विकास अधिक समाधानकारक रीतीनें व तीव्रतेनें करणें जरूर आहे, त्याचप्रमाणें योगक्षेमासाठी जमिनीवर अवलंबून असणाऱ्या माणसांची संख्या कमी करण्यांत आली पाहिजे आणि विकासाच्या योजनांचीं जीं कामें सुरू करण्यांत येतील त्यामधून काम करण्याची कांहीं एका प्रकारची सक्ति करण्यांत आली पाहिजे.




माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विश्राहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.






# अर्थ

बुधवार, ता. १७ एप्रिल, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बँका आणि त्यांतील नोकरवर्ग

### श्री. भाभा ह्यांची भयसूचना

१९५६ हें वर्ष हिंदी बँकांना चांगलें गेलें, तरी नफ्याचा मोठा अंश राखून ठेवून आणि अनपेक्षित आपत्तीची तयारी ठेवून बँकांची मजबुती आणखी वाढविण्याची आवश्यकता आहे. ह्या बाबतींत कितीहि प्रगति झाली, तरी तेथें न थांबतां आणखी पुढें प्रगति करणें हेंच श्रेयस्कर असतें. नेहमींचे धोके व अडचणी ह्यांत सरकारी रोख्यांच्या किंमतींमधील घट आणि कर्जदारांची बेजबाबदारीनें बँकांच्या गळयांत धोके व अडचणी अडकावण्याची वाढती संख्या व प्रवृत्ति ह्यांची भर पडत आहे. ह्या गोष्टींचा श्री. सी. एच्. भाभा ह्यांनीं आपल्या, इंडियन बँक्स असोसिएशनच्या वार्षिक सभेंतील भाषणांत उल्लेख केला; त्याबरोबरच नोकरवर्गाच्या पगाराचा वाढता बोजा व त्याची असहकाराची वृत्ति ह्यांवरहि टीका केली.

बँकांच्या वाढत्या नफ्याचे मानानें अप्रमाण गतीनें नोकरवर्गावरील खर्च वाढत आहे, हें खालील तुलनात्मक आंकडे दर्शवितात :—

( आंकडे लक्ष रुपयांचे )

| वर्ष | नोकरवर्गावरील खर्च | ठोक नफा | नोकरवर्गावरील खर्चाचें ठोक नफ्याशीं % प्रमाण |
|---|---|---|---|
| १९५२ | १२,८४·३ | २५,३२·१ | ५०·०७ |
| १९५३ | १३,२५·९ | २४,६८·८ | ५३·७१ |
| १९५४ | १४,०९·३ | २६,१४·४ | ५३·९० |
| १९५५ | १६,०८·४ | २८,८०·४ | ५५·८४ |

इतर देशांच्या तुलनेनें, हिंदी बँकांवरील नोकरवर्गाच्या खर्चाचा बोजा फार मोठा आहे आणि तो वाढत चालला आहे. इंडस्ट्रिअल डिस्प्यूट्स ( बँकिंग कंपनीज ) डिसिजन ॲक्ट, १९५५ नें बँकिंग क्षेत्रांतील औद्योगिक नातीं नियंत्रित केलीं असल्यानें, त्याबाबतींमधील कटकटी मिटावयास हव्या होत्या. तथापि, १९५६ च्या प्रारंभीं थोडी तेढ निर्माण झाली. गजेंद्रगडकर कमिशनच्या शिफारसींच्या अर्थाबाबत लेबर अपेलेट ट्रायब्यूनलचा अभिप्राय नोकरांच्या मागणीवरून सरकारनें मागविला. गेल्या वर्षांत बँकांनीं ओव्हरटाइम कामासाठीं दिलेला अलावन्स फारच वाढला, ह्याचें कारण नोकर नेहेमींच्या कामाच्या तासांत फारच मंद गतीनें काम करतात हें होय, असें श्री. भाभा ह्यांनीं सांगितलें आहे.

भारतांतील बहुतेक बँकांचा अनुभव असा आहे, कीं दर नोकरामागें पुऱ्या होणाऱ्या कामाचें प्रमाण पुष्कळच खालीं गेलें आहे. नोकरांच्या कित्येक क्लृप्त्यांमुळें बँकांतून शिस्त राखणें अवघड होत चाललें आहे; सहाजीकच त्याचा कार्यक्षमतेवर परिणाम होत आहे. कामाला उशिरा येणें, रजा न घेतां गैरहजर रहाणें, परवानगी व घेतां रजा संपल्यावरहि घरीं रहाणें, क्षुल्लक कारणांसाठीं हक्काची रजा मागणें, कर्तव्यांत कुचराई व दिरंगाई, कामांत निष्काळजीपणा, इत्यादि अनिष्ट प्रकार बँकांत मोठ्या प्रमाणावर चालू आहेत. बँकांचे गिऱ्हाईक व व्यापारी ह्यांची त्यामुळें गैरसोय होते, त्याबरोबर बँकांच्या व्यवस्थापकांचीहि कुचंबणा होते; आणि व्यवस्थापक—नोकर ह्यांतील औद्योगिक नातें पार बिघडून जातें. इंडस्ट्रिअल डिस्प्यूट्स ( बँकिंग कंपनीज ) डिसिजन ॲक्टानें नोकरवर्गाची परिस्थिति सुधारल्यानंतर नोकर हे अधिक सहकाराची वृत्ति दर्शवितील, अशी अपेक्षा होती; व्यवस्थापक—नोकर संबंध सुधारतील अशी आशा होती. कांहीं बँकांतून, कांहीं प्रमाणांत, सुधारणा दिसून येत आहे; परंतु साकल्यानें विचार केला, तर परिस्थिति उत्साहकारक नाहीं. व्यवस्थापक व नोकर ह्या दोघांत सलोख्याचें नातें राहिलें तरच बँकांची प्रगति होऊन सर्वांचेंच हित साधेल, हें केव्हां पटेल, तेव्हां पटो !

बँकांच्या व्यवस्थापकांना भरमसाट वेतन देण्यांत येत असतें, अशी तक्रार ऐकूं येते, तिला श्री. भाभा ह्यांनीं उत्तर दिलें आहे. सहा प्रमुख हिंदी जॉइंट स्टॉक बँकांच्या मुख्य व्यवस्थापकांना दिल्या जाणाऱ्या वेतनाची बेरीज केली, तर ती त्या बँकांच्या एकूण पगाराच्या रकमेच्या ·००४% एवढीच भरते. ह्या सहा बँकांच्या मुख्य व्यवस्थापकांना मिळणारें वेतन त्या बँकांच्या सर्व नोकरांत वाटून द्यावयाचें म्हटलें, तर प्रत्येकाच्या वांट्याला एक पुरी पै सुद्धां येणार नाहीं. ह्या वेतनाबद्दल करण्यांत येणारी तक्रार केवळ प्रचारी स्वरूपाची आहे. त्यांना अवाच्यासवा वेतन द्यावें असें श्री. भाभा ह्यांचें म्हणणें नाहीं; पण जनतेच्या शेंकडों कोटी रुपयांची व्यवस्था पहाणाऱ्या, देशाच्या त्वरित प्रगतीस हातभार लावणाऱ्या बँक चालकांना पुरेसा चांगला दर्जा व चांगली रहाणी हीं मिळणें अगत्याचें आहे. जगांतील इतर देशांतील महत्त्वाच्या प्रमुखांना किती वेतन मिळते, ह्याचें आंकडे ह्यासंबंधांत उद्बोधक होतील. जनरल मोटर्सनें त्या कंपनीच्या प्रेसिडेंटला १९५३ मध्यें ६,३७,२३३ डॉलर्स दिले. ड्यू पॉंटच्या दहा औद्योगिक खात्याच्या प्रमुखांना प्रत्येकीं सालिना २,३०,००० डॉलर्स मिळतात. गेल्या वर्षी जनरल मोटर्सच्या दोघांना व बेथलेहेम स्टील कॉर्पोरेशनच्या एकाला प्रत्येकी ६,००,००० डॉलर्स मिळाले. प्रॉक्टर अँड गॅंबल कंपनीनें आपल्या प्रमुखाचा पगार ३,००,००० डॉलर्सवर नेला. फोर्ड मोटर कंपनीनें चेअरमन व प्रेसिडेंट ह्यांस प्रत्येकी ५,६५,००० डॉलर्स दिले. अमेरिकेंतील १३२ मोठ्या कंपन्यांपैकीं फक्त १६ कंपन्यांनीं आपल्या प्रमुखाला १,००,००० डॉलर्सपेक्षा कमी वेतन दिलें.

श्री. भाभा ह्यांनीं केलेल्या विवेचनास दुसरीहि बाजू आहे. बँकांच्या व्यवस्थापकांना मोठा पगार मिळतो ही नोकरांची खरी तक्रार नसून, नोकरांना किमान रहाणीसाठीं आवश्यक तेवढा पगार मिळत नसल्याची त्यांची तक्रार आहे. कनिष्ठ नोकरांना पुरेसें वेतन मिळाल्यावर त्यांच्या प्रचारास धार उरणारच नाहीं. इतर व्यवसायांच्या मानानें बँकिंगच्या व्यवसायांत नोकरांना पगार जास्त चांगले आहेत, एवढ्यानेंहि समाधान होऊं शकत नाहीं. इतर देशांतील बँकांशीं सर्वच बाबतींत तुलना करण्यांत आली पाहिजे. त्या देशांतील बँक—नोकरांस किमान

कोणत्या रहाणीनें रहातां येते, त्यांच्या रहाणींत कोणत्या गरजा व सोई भागविल्या जातात, हेंहि दाखवून दिलें पाहिजे. नोकर-वर्गाकडून अधिक कार्यक्षमतेची अपेक्षा बाळगणें केव्हांहि योग्यच आहे, आणि बँकांची नफा मिळविण्याची शक्ति वाढविण्यास त्यांनीं हातभार लावूनच आपला पगार वाढवून घेतला पाहिजे, हेंहि उघड आहे.

### अमेरिकेच्या वकिलाचें स्पष्टीकरण

अमेरिकेचे भारतामधील वकील, मि. एल्सवर्थ बंकर ह्यांनीं मद्रास येथें बोलतांना भारतांत अमेरिकन भांडवल गुंतविण्या-संबंधी आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले कीं, अमेरिकन भांडवल भारतावर स्वारी करण्यासाठीं टपलेलें आहे अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं. ह्या बाबतींत खुद्द अमेरिकेच्या औद्योगिक इतिहासाचें उदाहरण लक्षांत घेण्यासारखें आहे. गेल्या शतकाच्या उत्तरार्धांत व ह्या शतकाच्या प्रारंभीच्या वर्षांत अमेरिकेचा औद्योगिक विकास अतिशय झपाट्यानें झाला. पण ह्या विकास युरोपांतील भांडवल अमेरिकेंत गुंतविल्यामुळें मुख्यतः झाला. अमेरिकेला ज्याप्रमाणें परदेशीय भांडवलाचा फायदा घेतां आला, त्याचप्रमाणें तो भारतालाहि घेतां येईल. अर्थात् कोणत्या पद्धतीनें अमेरिकन भांडवल आकर्षिण्यांत यावें हें ठरवावें लागेल. भारत व अमेरिका ह्यांचे उद्देश एकच आहेत; दोघांनाहि आर्थिक विकास साधावयाचा आहे. पण तो साधतांना सक्तीचे श्रम, दडपशाही अगर मालमत्तेचा विनानिर्बंध अपहार ह्या गोष्टी टाळावयाच्या आहेत. दोन्ही देशांतील परिस्थिति भिन्न असेल. त्यामुळें एखाद्या प्रश्नाकडे बघण्याचा दृष्टिकोनहि भिन्न असूं शकेल. उदाहरणार्थ, भारतांत भांडवलाचा संचय होण्याची प्रवृत्ति तुलनेनें मंदगति आहे. औद्योगिक जीवनांत सरकारचा हिस्सा मोठा आहे. तथापि भारतानें आपल्या औद्योगिक भरभराटीच्या कार्यांत यश मिळवावें अशी आमची इच्छा आहे. कारण, आर्थिक स्वातंत्र्याच्या अभावीं राजकीय स्वातंत्र्य नष्टच होतें.

### कम्युनिस्ट राष्ट्रांविषयीं आंकडेवार माहिती.

संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या आंकडेशास्त्रीय कचेरीनें आपलें नवीन वार्षिक प्रसिद्ध केलें आहे. कम्युनिस्ट राष्ट्रांतील घडामोडीं-संबंधीं ह्या वार्षिकांत बरीच तपशीलवार माहिती देण्यांत आली असून ती बहुतांशीं नवीन आहे. वार्षिक १९५५ सालाचें आहे. बल्गेरिआ, पोलंड व हंगेरी ह्या देशांतील आंकडेशास्त्रज्ञांनीं आपआपल्या देशांतील अर्थशास्त्रीय व इतर माहिती प्रथमच पुरविली आहे, असा निर्देश वार्षिकाच्या प्रस्तावनेंत करण्यांत आला आहे. वार्षिकांत दिलेल्या आंकड्यांवरून असें दिसतें कीं जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी जवळजवळ एकतृतिआंश लोकसंख्या कम्युनिस्ट देशांतून सामावलेली आहे. रशिआची लोकसंख्या २० कोटींवर असून चीनची ५८ कोटींवर आहे. त्याशिवाय पूर्व युरोपांतील कम्युनिस्ट राष्ट्रांमधील लोकसंख्या वेगळी. कम्युनिस्ट राष्ट्रगटांतील कोळशाचें उत्पादन जगांतील कोळशाच्या एकूण उत्पादनाच्या ३० टक्के आहे. पोलादाच्या उत्पादनापैकी २२ टक्के उत्पादन ह्या राष्ट्रगटांत होतें. १९३७ ते १९५५ च्या दरम्यान सोव्हिएट रशिआ, चीन व पूर्व युरोपांतील चार देश ह्यांचें पोलादाचें उत्पादन १६० टक्क्यांनीं वाढल्याचें आढळून आलें. ह्याच कालखंडांत बाकीच्या जगांतील पोलादाचें उत्पादन ८६ टक्क्यांनीं वाढलें. ह्याच काळांत कम्युनिस्ट राष्ट्रगटांतील औद्योगिक शक्तीचा खप १५८ टक्क्यांनीं वाढला. जगाच्या इतर भागांतील औद्योगिक शक्तीचा खप १९३७ ते १९५५ ह्या अवधींत ६७ टक्क्यांनीं वाढला.


स्थापना सन १९३५ टे. नं. २६२५१८

**दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १

( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | |
|---|---|
| संकल्पित भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ९०,०००हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० " |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० " |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. भगवंतराव नामदेवराव ढोबळे, (अध्यक्ष)
श्री. गेनुभाऊ गोविंदराव ढोले, ( उपाध्यक्ष )
श्री. उमाकांत भाऊराव तांबे, ( ऑ. मॅ. डायरेक्टर )
श्री. मल्हारराव बाबुराव वेंडे, ( ऑ. ट्रेझरर )
श्री. आनंदराव पांडुजी ढोरे सभासद
श्री. मळीबुवा मार्तंड वामन "
श्री. गेनुजी लक्ष्मण नलवडे "
श्री. ज्ञानेश मारुतीराव मनसुख "
श्री. मनोहर रामजी नेहरकर "

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.



स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व हलकर्णी

ता. ३१-३-५६ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | २,२८,००० |
| ठेवी व इतर फंडस् | रु. | १,१२,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,२०,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

## भारतांतील खनिज कोळशाचा धंदा

भारतांतील कोळशाच्या उत्पादनापैकीं बहुतेक सर्व उत्पादन बिहार, बंगाल व मध्यप्रदेश ह्यांतच होतें, हें खालील तक्त्यावरून दिसून येईल.

कोळशाचें उत्पादन : राज्यवार % वांटणी

| राज्य | १९५० | १९५१ | १९५२ | १९५३ | १९५४ |
|---|---|---|---|---|---|
| १. बिहार | ५४·१६ | ५४·० | ५३·१ | ५२·९ | ५१·९७ |
| २. बंगाल | २७·७७ | २८·० | २८·५ | २८·४ | २८·७९ |
| ३. मध्यप्रदेश | ९·४१ | ९·३ | ९·४ | ९·८ | ९·८१ |
| ४. हैद्राबाद | ३·७६ | ३·६ | ४·० | ३·७ | ४·०७ |
| ५. विंध्यप्रदेश | २·४५ | २·२ | २·२ | २·४ | २·५३ |
| ६. ओरिसा | १·१६ | १·४ | १·३ | १·४ | १·४२ |
| ७. आसाम | १·२२ | १·४ | १·४ | १·३ | १·३३ |
| ८. राजस्थान | ०·०७ | ०·१ | ०·१ | ०·१ | ०·०८ |

राणीगंज येथील कोळशाच्या खाणींत अद्याप शिल्लक असलेली कोळशाची संपत्ति १२०० कोटी टन आहे; १९२८ सालाच्या अंदाजाच्या मानानें हा ताजा अंदाज दुपटीइतका आहे. हल्लींच्या उत्पादनाच्या मानानें, हा सांठा शेंकडों वर्षे पुरेल. मध्यप्रदेशांतील कोर्बा खाणींतहि भरपूर सांठा आहे.

कांहीं राज्यांतून कोळसा भरपूर आहे, तर कांहीं राज्यांतून त्याचा तुटवडा आहे व त्यामुळें तेथें औद्योगिक प्रगतीस आडकाठी येते. विशेषतः दक्षिण भारत, सौराष्ट्र व उत्तर बिहार येथें कोळशाचा तुटवडा फारच भासतो. वहातुकीच्या अडचणीमुळें पुरवठ्याची परिस्थिति अधिकच बिघडते. आगगाडीच्या वॅगन्सच्या भरतीपैकी ३५% माल कोळसा हाच असतो. इतर मालाचे मानानें कोळशाची वहातुक दूर ठिकाणीं करावी लागते, त्यामुळें "टन–मैला" चा हिशेब केला, तर रेल्वे वहातुकींत कोळशाची वहातुक ४५% भरते.

कोळशाचें उत्पादन

| वर्ष | टन |
|---|---|
| १९४७ | ३०,१४४,५०५ |
| १९४८ | ३०,१२४,१७५ |
| १९४९ | ३१,६९५,३७५ |
| १९५० | ३२,३०७,४८१ |
| १९५१ | ३४,४३०,५२२ |
| १९५२ | ३६,३०१,८६५ |
| १९५३ | ३५,९७९,१६७ |
| १९५४ | ३४,८८०,८१० |

कोळसा–खाणींत गुंतवलेलें भांडवल

| वर्ष | कंपन्यांची संख्या | लक्ष रु. |
|---|---|---|
| १९४६–४७ | ३६२ | १२,४७ |
| १९४७–४८ | ३८८ | १५,४४ |
| १९४८–४९ | ४०३ | १७,२२ |
| १९४९–५० | ४२७ | १८,६९ |
| १९५०–५१ | ४४६ | १९,६५ |
| १९५१–५२ | ४४८ | २१,०९ |
| १९५२–५३ | ४५८ | २१,६८ |
| १९५३–५४ | ४७५ | २२,४२ |

कोळशाच्या धंद्यांत गुंतलेलीं माणसें

| वर्ष | माणसांची संख्या |
|---|---|
| १९४७ | ३,६३,९९४ |
| १९४८ | ३,४८,३८२ |
| १९४९ | ३,४५,१९० |
| १९५० | ३,४९,८८९ |
| १९५१ | ३,५१,९७५ |
| १९५२ | ३,४८,६६२ |
| १९५३ | ३,४१,१९३ |
| १९५४ | ३,४०,९६४ |

### सातारा स्वदेशी कमर्शिअल बँक लि.

वरील बँकेस गेल्या वर्षाचा शिलकी नफा (१,७३० रु.) धरून ५५,६६९ रु. निवळ नफा झाला. त्यापैकीं १५,००० रु. रिझर्व्ह फंडाकडे वर्ग करून; ७,००० रु. कॉन्टिन्जन्सी फंडांत घालून व ३,००० रु. ची नोकरवर्गाला बोनसची तरतूद करून ३०,६६९ रु. नफा वांटणीस उरतात. ऑर्डिनरी भागांस ६% करमाफ व प्रेफरन्स भागांत ५% व ६% वजाकर डिव्हिडंडसाठीं १४,२७२ रु. लागतील व उरलेले १६,३९६ रु. पुढील वर्षाच्या हिशोबांत घेतले जातील. अहवालाच्या वर्षी ठेवी व कर्जे ह्या दोन्हींत समाधानकारक वाढ झाली. बँकेच्या कोरेगांव येथील नव्या कचेरीचें काम समाधानकारक चालू आहे.

बँकेची कायदेशीर स्थापना २०–८–१९०७ रोजीं झाली; म्हणजे १९५७ च्या ऑगस्टमध्यें बँकेची सुवर्ण ज्युबिली येत आहे. हा शुभ प्रसंग अर्थातच योग्य रीतीनें साजरा करण्यांत येणार आहे. (चेअरमन : रावसाहेब कृष्णाजी दिनकर माजगांवकर. मॅनेजर : व्ही. वाय. कुलकर्णी, एम्. ए., बी. कॉम.)

### कुळ वहिवाट कायद्याबाबत सूट

मुंबई सरकारनें १९४८ च्या मुंबई कुळ वहिवाट आणि शेत जमीन कायद्याच्या कलम ४३ अ (१) (अ) च्या बाबतींत पुढील तीन औद्योगिक कंपन्यांना मान्यता दिली आहे.

वालचंद नगर इंडस्ट्रीज, लिमिटेड, वालचंदनगर, पुणें जिल्हा; रावळगांव शुगर फार्म लिमिटेड, रावळगांव, नाशिक जिल्हा; आणि श्रीचांगदेव शुगर मिल्स लिमिटेड, चांगदेवनगर, अहमदनगर जिल्हा.

याचा परिणाम म्हणून या कंपन्यांना दिलेल्या अथवा या कंपन्यांच्या फायद्यासाठीं दिलेल्या जमिनींच्या भाडेपट्ट्याच्या बाबतींत सदरहू कायद्याचीं पुढील कलमें लागू नाहींत. ४ ब, ८, ९, ९ अ, ९ ब, ९ क, १०, १० अ, १४, १६, १७, १७ अ, १७ ब, १८, ३१ ते ३१ डी (दोन्ही धरून) ३२ ते ३२ आर (दोन्ही धरून) ३४, ३५, ४३, ६३, ६३ अ, ६४ आणि ६५.

### ग्लॅक्सो कंपनींतील शास्त्रज्ञाचा गौरव

ग्लॅक्सो लॅबोरेटरीज लि. ह्या सुप्रसिद्ध कारखान्यांत संशोधन-कार्य करणारा शास्त्रज्ञ, डॉ. ई. लेस्टर स्मिथ, ह्याची रॉयल सोसायटीचा फेलो म्हणून निवडणूक झाली आहे. व्हिटॅमिन बी–१२ चा शोध लावणाऱ्या शास्त्रज्ञांच्या तुकडीचा प्रमुख, म्हणून त्याची कीर्ति वैद्यकीय जगांत पसरलेली आहे. पाश्चात्य कारखान्यांतून किती उच्च दर्जाच्या संशोधकार्याची योजना करण्यांत येते, हें त्यावरून दिसून येतें.

## मुंबई सरकारचीं विक्रीसाठी प्रकाशनें

[ प्रकाशनांची किंमत आगाऊ मनिऑर्डरनें अथवा पोस्टाच्या तिकिटांच्या रूपानें पाठविली पाहिजे. मागविण्याचा पत्ता : मुंबई सरकारचें प्रसिद्धि खातें, इस्टेट नं. ६, फोर शोअर रोड, मुंबई नं. १. ]

लोकराज्य:— हें साप्ताहिक दर गुरुवारीं प्रसिद्ध होतें व त्यांत सर्व महत्त्वाचीं सरकारी निवेदनें प्रसिद्ध करण्यांत येतात. हें प्रकाशन मराठी, गुजराती, इंग्रजी आणि हिंदी या भाषांत प्रसिद्ध होतें. वार्षिक वर्गणी एका प्रतीस रु. २ ( दोन रुपये ).

शेतकरी:— ग्रामीण विकासाला व प्रामुख्यानें शेतकी विकासाला वाहिलेलें हें मासिक "फार्मर" या नांवानें इंग्रजींत, "शेतकरी" म्हणून मराठींत आणि "खेडुत बंधु" म्हणून गुजरातींत प्रसिद्ध होतें. प्रत्येक आवृत्तीच्या एका प्रतीची वार्षिक वर्गणी रु. ३.

सर्वोदय मासिक:— हें मासिक मराठी, गुजराती व हिन्दी या भाषांत संयुक्तरीत्या प्रसिद्ध होतें. वार्षिक वर्गणी रु. ५.

व्हॉट बॉम्बे गव्हर्नमेन्ट डिड ॲन्ड सेड-:मुंबई सरकाच्या प्रसिद्धि खात्यातर्फे वृत्तपत्रांना पुरविण्यांत येणाऱ्या सरकारी परिपत्रकांचें आणि वृत्तविशेषणाचें इंग्रजीमध्यें संकलन या त्रैमासिकांत केलेलें असतें. वार्षिक वर्गणी रु. ४ (रुपये ४ फक्त) प्रत्येक त्रैमासिकाच्या एका प्रतीची किंमत रु. १.

मुंबई पोलिस त्रैमासिक:—ह्या त्रैमासिकांत मुंबई राज्यांतील पोलिसांच्या कार्याबाबतची माहिती देण्यांत येते. प्रत्येक अंकांत इंग्रजी, मराठी आणि गुजराती या तिन्ही भाषांत साहित्य देण्यांत येतें. वार्षिक वर्गणी रु. २ ( रुपये दोन फक्त ) प्रत्येक प्रतीला आठ आणे.

मुलांनीं रस्त्यांतून कसें चालावें:— रस्त्यांतून चालतांना मुलांनीं रहदारीसंबंधीं कोणती काळजी घ्यावी त्याची माहिती देणारें इंग्रजी, मराठी, गुजराती आणि हिंदी या भाषांत हें पुस्तक प्रसिद्ध करण्यांत आलें असून प्रत्येक भाषेंतील प्रत्येक प्रतीची किंमत फक्त दोन आणे.

महात्मा गांधींचीं प्रार्थनोत्तर सभांतील भाषणें:— फक्त मराठी भाषेंतच हें पुस्तक प्रसिद्ध करण्यांत आलें असून त्याची किंमत प्रतीस १ रु. ४ आणे आहे.

मुंबई १९५६:— फक्त इंग्रजींतच हें पुस्तक प्रसिद्ध करण्यांत आलें असून त्याची किंमत प्रतीस रु. २-८-० अशी आहे.

दारुबंदी : प्रश्न आणि उत्तरें :—हें पुस्तक इंग्रजी, मराठी, गुजराती आणि हिंदी या भाषांत प्रसिद्ध झालें आहे. किंमत प्रत्येक प्रतीस ४ आणे.

लोकमान्य टिळक : जीवन दर्शन :— हें पुस्तक फक्त मराठी भाषेंतच प्रसिद्ध झालें असून त्याची किंमत प्रतीस १२ आणे आहे.

क्रॉप पेस्टस् ॲन्ड हाऊ टु फाईट देम :—फक्त इंग्रजींतच हें पुस्तक प्रसिद्ध झालें आहे. किंमत प्रतीस रु. २.

द्वितीय पंचवार्षिक योजना :— सारांशरूपानें जनता आवृत्ति :—मराठी आणि गुजराती भाषेंत हें पुस्तक प्रसिद्ध झालें आहे. प्रत्येक भाषेंतील प्रत्येक प्रतीस किंमत ६ आणे.

द्वितीय पंचवार्षिक योजना : अधिकृत सारांश :— प्रत्येक आवृत्तींतील प्रत्येक प्रतीस किंमत रु. १.

मुंबई राज्यांतील वीजयोजना :—हें पुस्तक मराठी, गुजराती व इंग्रजी या भाषांत प्रसिद्ध झालें असून प्रतीची किंमत दोन आणे.

वन्य पशुपक्षी :—इंग्रजी, मराठी आणि गुजराती या भाषांत हें पुस्तक प्रसिद्ध झालें असून प्रतीची किंमत १ आणा.

मुंबई राज्यांतील होमगार्ड्स :—हें पुस्तक फक्त इंग्रजी भाषेंत प्रसिद्ध झालें असून किंमत १ आणा.

बी. सी. जी. :—इंग्रजी, मराठी, आणि गुजराती भाषेंत हें पुस्तक प्रसिद्ध झालें असून किंमत १ आणा.

नियोजनाची दिशा :—पंडित नेहरूंचीं दोन भाषणें:—फक्त मराठी भाषेंत हें प्रसिद्ध झालें असून किंमत प्रतीस दोन आणे.

नवें मुंबई राज्य :—हें पुस्तक मराठी, गुजराती आणि इंग्रजी या भाषांत प्रसिद्ध झालें असून प्रत्येक भाषेंतील प्रत्येक प्रतीची किंमत चार आणे.

टॉवर्डस वेल्फेअर स्टेट भाग १ आणि २ :—फक्त इंग्रजी, किंमत प्रतीस १० आणे.

जंगलांच्या नाशामुळें जमिनीची धूप कशी होते:—इंग्रजी, मराठी आणि गुजराती भाषेंत हें पुस्तक प्रसिद्ध झालें असून प्रत्येक भाषेंतील प्रतीची किंमत दोन आणे.

रोड टु गुड न्युट्रेशन :—फक्त इंग्रजी. किंमत प्रतीस आठ आणे.

भाजीपाल्याची लागवड:— भाजीपाल्याची लागवड कशी करावी त्याची माहिती देणारें पुस्तक. किंमत २ आणे.

दारुबंदीमुळें नवजीवन:— मुंबई राज्याच्या दारुबंदीच्या धोरणामुळें लोकांचा कसा फायदा झाला आहे याची माहिती देणारी पुस्तिका. किंमत १ आणा.

मुंबई राज्यांतील यांत्रिक शेती:— मुंबई राज्यांतील यांत्रिक शेतीच्या प्रगतीची माहिती देणारी पुस्तिका. किंमत २ आणे.

---

## जुन्या नाण्यांतील बिगरपोस्टल स्टँप

### दशमान पद्धतींत बदलण्याची व्यवस्था

१ एप्रिल, १९५७ पासून दशमान पद्धतीचीं नवीं नाणीं अंमलांत आलीं असलीं तरी रुपये, आणे, पै, असें मूल्य असलेलीं बिगरपोस्टाचीं तिकिटें १ एप्रिल, १९५८ पर्यंत लोकांना विकण्यांत येतील. हीं तिकिटें लोकांना त्यांची किंमत नव्या नाण्यांत देऊन विकत घेतां येतील.

जेव्हां एकादा इसम कांहीं बिगर पोस्टाचीं तिकिटें विकत घेईल त्यावेळीं त्यांची दशमान नाण्यांतील एकूण सम किंमत किती होते तें मोजण्यांत येईल व त्यांत जर नया पैशाचा कांहीं अपूर्णांक येत असेल तर१९५५च्या इंडियन कॉयनेज (अमेंडमेंट) ॲक्टानुसार त्याची विल्हेवाट लावण्यांत येईल म्हणजे असें कीं हा अपूर्णांक नया अर्ध्या पैशापेक्षा कमी येत असेल तर तो सोडून देण्यांत येईल व अपूर्णांकातील किंमत नया अर्ध्या पैशापेक्षा अधिक येत असेल तर जुना पूर्ण पैसा घेण्यांत येईल, उदाहरणार्थ, १ आण्याच्या तिकिटाची नया पैशांत अचूक सम किंमत ६·२५ नये पैसे अशी येते. एकाद्या इसमानें असें एक तिकीट घेतलें तर त्याला तें फक्त ६ नया पैशांना देण्यांत येईल व ०·२५ नया पैसा सोडून देण्यांत येईल. तथापि त्यानें जर एक आणा किंमतीचीं तीन तिकिटें घेतलीं तर त्याची नव्या नाण्यांतील एकूण सम किंमत १८·७५ नये पैसे अशी येते. म्हणून येथें त्याला १९ नये पैसे द्यावे लागतील. एकूण किंमत आणे, पैं, मोजून रुपयाचा कांहीं अपूर्णांक राहिल्यास त्याचें रूपांतर कोष्टक पत्रकाच्या साह्यानें नव्या दशमान नाण्यांत करावें व अशा-रीतीनेंहि ही रीत साधतां येते.

इन्कमटॅक्स कायद्याखालील—

## भागीदारीचें रजिस्ट्रेशन

लेखकः—श्री. वृ. श्री. मराठे, बी. ए., एलएल. बी., पुणें

भागीदारीच्या कायद्यासंबंधानें मुंबई हायकोर्टानें नुकताच दिलेला एक निकाल व्यापारी वर्गाच्या दृष्टीनें महत्त्वाचा आहे. प्राप्तीवरील कराच्यासाठी इन्कमटॅक्स ऑफिसरकडे भागीदारी नोंदवून घेणें अगत्याचें असतें. अशा तऱ्हेनें भागीदारी जर नोंदविलेली नसली तर त्यांतून बराच त्रास व गैरसोय निर्माण होते.

भागीदारी नोंदवून घेण्यासाठी ती भागीदारीच्या कायद्यांत "भागीदारी" या शब्दाची जी व्याख्या दिलेली आहे त्या व्याख्येंत बसण्यासारखी असावी लागते; नाहींतर इन्कमटॅक्सकडील अधिकारी ही भागीदारी नोंदवून घेण्याचें नाकारतात. ज्या व्यक्तींनीं, त्यांच्यापैकी एकानें अथवा अनेकांनीं सर्वांच्याकरितां चालविलेल्या धंद्यांतील फायदा वांटून घेण्याचा करार केला असेल अशा व्यक्तींच्या मधलें जें नातें, त्या नात्याला कायद्यांत भागीदारी म्हणतात. ज्या व्यक्तींनीं असा फायदा आपसांत वांटून घेण्याचा करार केला असेल त्या व्यक्तींना "भागीदार" म्हणतात व ज्या नांवानें धंदा चालविला जातो त्याला भागीदारीचें नांव म्हणतात.

व्यक्ति धंद्यांतील फायदा आपसांत वांटून घेण्याचा करार करून हें नातें उत्पन्न करूं शकतात हें जरी खरें असलें तरी एक भागीदारी ही दुसऱ्या व्यक्तीशीं अथवा भागीदारीशीं धंद्यांतील फायदा वांटून घेण्याचा करार करून एक नवीन भागीदारी निर्माण करूं शकते का हा प्रश्न महत्त्वाचा असतो. या प्रश्नाचें उत्तर आपण "व्यक्ति" या शब्दाचा अर्थ काय लावूं शकतो यावर अवलंबून आहे. कारण, करार करून आपसांत भागीदारीचें नातें उत्पन्न करण्याचा हक्क व्यक्तींचा आहे.

भागीदारी अस्तित्वांत आणण्याचा हा हक्क व्यक्तीला दिलेला असल्याकारणानें एक भागीदारी ही दुसऱ्या भागीदारीची घटक भागीदार होऊं शकत नाहीं. व्यवहारांत मात्र आपल्याला अशा पुष्कळ भागीदाऱ्या आढळून येतात. कायद्यानें ज्या गोष्टींना परवानगी नाहीं अशा पुष्कळ गोष्टी नित्यशः चाललेल्या असतात. व्यवहारांत हे प्रकार सांपडतात, म्हणून ते कायदेशीर असलेच पाहिजेत अशी समजूत करून घेण्याचें कारण नाहीं.

बेकायदेशीर गोष्टींत दोन प्रकार असतात. एका बेकायदा वागण्यानें माणूस गुन्हेगार म्हणून शिक्षेला पात्र होतो, तर दुसऱ्या बेकायदेशीर प्रकाराबद्दल कायद्याची भूमिका एवढीच असते कीं अशा वागण्याबद्दल शिक्षा जी द्यावयाची ती एवढीच कीं वेडेपणामुळें तुम्ही जे गोंधळ करून ठेविले आहेत ते तुमचे तुम्हीच निस्तरा; तुम्हांला स्वतःची सुटका करून घ्यावयास कायद्याची मदत मिळणार नाहीं. अशा वेडेपणाच्या करारामुळें तुमच्यांत जें नातें उत्पन्न होणार त्याला कायदा भागीदारी म्हणणार नाहीं व भागीदारीच्या नात्यानें होणारे फायदे कोर्टाच्या मदतीनें करून घेतां येणार नाहींत.

व्यवहारांतला आणखी एक दाखला दिल्यास हें जास्त स्पष्ट होईल. दोन व्यक्तींनीं लग्न न करतां एकत्र राहण्यास कायद्यानें बंदी नसते, पण त्यांना जर मुलें झालीं तर त्या मुलांना वारसाचा हक्क मिळणार नाहीं. अशा रीतीनें एकत्र राहणाऱ्या व्यक्तींना एकमेकांवर नवरा, बायको, हे हक्क असे सांगतां येणार नाहींत, त्याचप्रमाणें जी भागीदारी कायदेशीर होत नाहीं, असलें विचित्र नातें उत्पन्न करणारांचे आपसांत गोडींत चाललें आहे तोंपर्यंत ठीक असतें, पण आपसांत वैमनस्य आलें म्हणजे मग या नात्याचा बेकायदेशीरपणा नडावयास लागतो.

भागीदारी ही व्यक्ति नाहीं व एका भागीदारीला दुसऱ्याशीं फायदा वांटून घेण्याचा करार करून नवीन भागीदारी निर्माण करितां येत नाहीं, असा निकाल दलीचंद लक्ष्मीनारायण या दाव्यांत सुप्रीम कोर्टानें दिलेला असल्याकारणानें तो सर्व हायकोर्टांवर बंधनकारक आहे. पण यांतूनसुद्धां कोणत्या परिस्थितींत मार्ग निघूं शकतो हें पाहण्यासारखें आहे.

सर्वसामान्य वाचकांना हा शब्दच्छल वाटेल, पण याला व्यावहारिक महत्त्व मात्र फार आहे. अ, ब, क यांनीं मिळून एक क्ष नांवाची भागीदारी केली तर या त्यांच्या क्ष भागीदारीला ड या व्यक्तीशीं नवीन भागीदारी करितां येणार नाहीं. पण अ, ब व क हे एकदां एका भागीदाराचे घटक असले म्हणून त्यांना आणखी दुसऱ्या कोठल्या भागीदारींत घटक होतां येत नाहीं असें थोडेंच आहे ? याचा परिणाम असा होतो कीं ज्या भागीदारीचे घटक क्ष व ड असे आहेत अशी भागीदारी कायद्यानें जरी अस्तित्वांत येऊं शकली नाहीं तरी अ, ब, क व ड यांना वैयक्तिक रीत्या एकत्र येऊन नवी भागीदारी काढावयास कायद्यानें हरकत नाहीं.

मुंबई हायकोर्टानें नुकत्याच दिलेल्या निवाड्यानें हा मुद्दा स्पष्ट केला. २६ ऑक्टोबर, १९५० रोजीं चार भागीदार असलेली एक भागीदारी भागीपत्र करून निर्माण करण्यांत आली. या भागीदारांचे पैकीं दोन भागीदार म्हणजे स्वतंत्र व्यक्ति होत्या व दोन भागीपत्रांत चंदुलाल दयालाल आणि कंपनी व शांतीलाल व्रजलाल आणि कंपनी अशा दोन भागीदाऱ्या दाखविल्या होत्या. दोन खाजगी व्यक्ति व दोन भागीदाऱ्या या चौघांनीं मिळून काढलेली ही नवीन भागीदारी नोंदवून द्यावी असा अर्ज १८ ऑगस्ट १९५१ रोजीं इन्कमटॅक्स ऑफिसरकडे करण्यांत आला. पण या अर्जावर कांहींच हुकूम करण्यांत आला नाहीं.

यानंतर १२ सप्टेंबर १९५१ रोजीं एक नवें भागीपत्र करण्यांत आलें. या नव्या भागीपत्रांत चंदुलाल दयालाल आणि कंपनी व शांतिलाल व्रजलाल आणि कंपनी या भागीदाऱ्यांचा नव्या भागीदारींतील घटक भागीदार म्हणून जरी उल्लेख होता तरीसुद्धां चंदुलाल दयालाल आणि कंपनी व शांतिलाल व्रजलाल आणि कंपन्या या कोणकोणत्या भागीदारांच्या मिळून झालेल्या होत्या त्या भागीदारांचीं नांवें व त्यांचे हिस्से या सर्वांचा तपशीलवार उल्लेख केला होता. या नव्या भागीपत्राच्या आधारानें त्याच दिवशीं म्हणजे १२ सप्टेंबर, १९५१ रोजीं पुनश्च इन्कमटॅक्स ऑफिसरकडे नवी भागीदारी नोंदविण्याचा अर्ज करण्यांत आला.

या नव्या अर्जावरून हें प्रकरण मुंबई हायकोर्टांत गेलें असतां न्यायमूर्तींनीं असें मत दिलें कीं, पहिल्या अर्जाची दखल घेण्यांत आली नाहीं हें योग्य झालें. पण दुसऱ्या अर्जाप्रमाणें नवीन भागीदारी इन्कमटॅक्स ऑफिसरनें नोंदावयास पाहिजे. कारण नव्या भागीपत्राअन्वयें उत्पन्न झालेल्या भागीदारीचे घटक यांना स्वतंत्र वैयक्तिक अस्तित्व आहे. आणि ते व्यक्ति या नात्यानें नवीन भागीदारी अस्तित्वांत आणीत आहेत व त्यांना तसें करण्यास कायद्याची कोणतीहि हरकत नाहीं.

या सर्व गुंतागुंतीच्या निकालांचेवरून व्यापाऱ्यांनीं बोध

पुढाच घ्यावयाचा कीं अस्तित्वांत असलेल्या एका भागीदारीनें दुसऱ्या एकाद्या भागीदारीच्या पातींत म्हणून एखादा नवा धंदा करण्याच्या भानगडींत पडूं नये. धंदा करावयाचाच झाला तर त्या धंद्याचा प्रथमपासून अस्तित्वांत असलेल्या भागीदारीशीं संबंध असतां कामा नये. स्वतंत्र व्यक्ति या नात्यानें एकत्र येऊन पातींत नवीन धंदे सुरू करण्यास हरकत नसते. एक मनुष्य अनेक भागीदाऱ्यांचा घटक असावयास हरकत नाहीं. पण एक भागीदारी ही दुसऱ्या भागीदारीचा घटक होऊं शकत नाहीं हें सूत्रवाक्य लक्षांत ठेवलें म्हणजे पुष्कळसे घोटाळे कमी होतील.

[ "सहकार मासिक" एप्रिल, १९५७ ]

---

वेगवेगळ्या देशांतील साखरेची किरकोळीची किंमत
( १ जानेवारी, १९५६ )

| देश | दर पौंडास पेन्स | दर शेरास रु. आ. पै |
|---|---|---|
| युगोस्लाव्हिया | १८·६ | २—२—१ |
| इटली | १५·७ | १—१२—९ |
| जपान | १४·८ | १—११—१ |
| ग्रीस | १४·६ | १—१०—९ |
| सुदान | १२·५ | १—६—६ |
| फ्रान्स | १२·३ | १—६—४ |
| जर्मनी | १२·२ | १—६—३ |
| इंडोनेशिया | १०·५ | १—३—३ |
| फोर्मोसा | ९·९ | १—२—१ |
| अमेरिका | ९·० | १—०—१ |
| ग्रेटब्रिटन | ८·५ | ०—१५—७ |
| कॅनडा | ७·८ | ०—१४—४ |
| फिलिपाइन्स | ७·५ | ०—१३—९ |
| ऑस्ट्रेलिया | ७·२ | ०—१३—२ |
| मलाया | ७·२ | ०—१३—२ |
| भारत | ६·९ | ०—१२—८ |
| क्युबा | ५·८ | ०—१०—७ |

---

१९५५-५६ मधील साखरेचा राज्यवार दरमाणशीं खप

| | | |
|---|---|---|
| सौराष्ट्र | ३४·६६ | पौंड |
| मुंबई | २५·०५ | „ |
| पंजाब | २२·५० | „ |
| प. बंगाल | २१·१४ | „ |
| म. भारत | १४·३८ | „ |
| आसाम | १०·०५ | „ |
| मध्यप्रदेश | ९·८७ | „ |
| राजस्थान | ९·८१ | „ |
| म्हैसूर | ९·६३ | „ |
| उत्तरप्रदेश | ८·४६ | „ |
| बिहार | ६·९६ | „ |
| हैद्राबाद | ६·२४ | „ |
| मद्रास | ५·५० | „ |
| ओरिसा | ३·३६ | „ |
| इतर राज्यें ( आंध्र धरून ) | १९·१५ | „ |

**शिक्षकांना नोकरीची शाश्वति—केरळ.** राज्यांतील खाजगी शिक्षणसंस्थांत नोकरी करणाऱ्या शिक्षकांना त्यांच्या नोकरीबाबत शाश्वति देण्यासाठी राज्य सरकारनें एक कायदा करण्याचें ठरविलें आहे. इतर अनेक प्रकारच्या नोकरांना कांहीं-तरी कायदेशीर संरक्षण आहे; शिक्षकांना मात्र तें मुळींच नाहीं.

**आदिवासींनीं केलेली बचत**—मध्यप्रदेशांतील बस्तार जिल्ह्यांतील आदिवासींनी एका दिवसांत १,४०,००० रुपयांची रकम अल्प बचतयोजनेंत गुंतविली. एका गोंड जमातीच्या माणसानें १५,००० रुपये पोस्टऑफिस सेव्हिंग्ज बँकेंत व १,००० रुपये सहकारी बँकेंत ठेवले. त्याशिवाय २,००० रुपये नॅशनल सेव्हिंग्ज सर्टीफिकेटसमध्यें त्यानें गुंतविले.

**साखर कामगारासाठी वैद्यकीय मदत**—नगर जिल्ह्यांतील साखर कारखान्यांत काम करणाऱ्या कामगारांना वैद्यकीय मदत देण्यासाठी निधि जमविण्यांत येत आहे. श्री. ओगले ह्या कामगार कार्यकर्त्यानें निधि जमविण्यास सुरुवात केली आहे. २५,००० रु. जमविण्याचा त्यांचा मानस आहे.

**दारूबंदीला मदत**—दिल्ली प्रदेशाच्या अधिकाऱ्यांनीं दारूबंदीला मदत म्हणून दारुसंबंधीच्या जाहिराती वृत्तपत्रांत व नियतकालिकांत छापण्यास बंदी करणारा हुकूम काढला आहे. हुकूम मोडल्यास खटले करण्यांत येणार आहेत.

**१०० नव्या एंजिनांची मागणी**—रेल्वेबोर्डानें तेलावर चालणाऱ्या १०० रेल्वे एंजिनांची मागणी परदेशीय कारखान्यांतून नोंदविली आहे. हीं एंजिनें रुंद रुळावर धावणारीं असतील. सध्यां वाफेच्या एंजिनांपेक्षा तीं अधिक मोठ्या गाड्या अधिक वेगानें ओढूं शकतील. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत रेल्वेवाहतुकीवर पडणारा ताण ह्यांच्यामुळें थोडा कमी होईल.

**कापड गिरण्यांची यंत्रसामुग्री**—जपानच्या इंपोर्ट-एक्सपोर्ट बँकेचे प्रतिनिधी व भारताचे व्यापार खात्याचे प्रतिनिधी ह्यांच्या दरम्यान जपानकडून जलविद्युत् निर्मितीची व कापडाच्या गिरण्यांची यंत्रसामुग्री घेण्याबद्दल वाटाघाटी चालू आहेत. यंत्रसाहित्याची किंमत कांहीं काळानें देण्याची सवलत मिळण्याचा संभव आहे.

**सुएझ कालव्याचा सफाईचा खर्च**—सुएझचा कालवा आतां सर्व प्रकारच्या बोटींना वाहतुकीसाठी खुला करण्यांत आला आहे. कालव्याच्या सफाईच्या कामांत निरनिराळ्या देशाच्या ४५० नागरिकांनीं भाग घेतला होता. सफाईसाठी ३१ बोटी खपत होत्या. एकूण खर्च सुमारें १·२ ते १·५ कोटी डॉलर्स आला.

**चिलीमधील दंग्याचें कारण**—चिलीमधील सँटिॲगो शहरांत नुकत्याच दंगली झाल्या व लष्करी उपाय योजावे लागले. बेसुमार चलनवृद्धि व त्यामुळें झालेली असह्य महागाई ह्यांच्यामुळें लोक भडकले होते. महागाईविरुद्धच्या संतापामुळें हे दंगे झाले असें म्हणतात.

**सिमेंटचे दोन नवे कारखाने**—आंध्र राज्यांत सिमेंट तयार करण्याचे दोन नवे कारखाने काढण्यांत येणार आहेत. त्यांपैकी एक कारखाना आदिलाबाद जिल्ह्यांत निघणार असून त्यांत ५०० टन सिमेंट तयार होईल. सिमेंट उत्पादनास अत्यंत उपयुक्त असा ६०० कोटी टन चुनखडीचा दगड आंध्र राज्यांत मिळूं शकेल.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.